
साहित्य प्रतिष्ठान
अहं ब्रह्मास्मि

❖ पुस्तक

**अहं ब्रह्मास्मि**

❖ कवी

**स्वर्गीय घनश्याम अच्युत पोटभरे उर्फ अहं ब्रह्मास्मि**

**पुणे**

**जन्म - ८ एप्रिल १९६५**

**मृत्यु - ८ एप्रिल २०१०**

❖ रेखाचित्रे

**श्री. सुरेश पेठे, पुणे**

**भ्रमणध्वनी - ९८५०४८८६४०**

**ईमेल - sureshpethe@gmail.com**

❖ मुखपृष्ठ

**आनंद माने**

**L**ast **B**ench **D**esigns

(where creativity begins)

❖ मांडणी व सजावट

**भारती सरमळकर**

❖ सहकार्य

**ई-साहित्य परिवार**

❖ प्रकाशक

**ई-साहित्य प्रतिष्ठान, ठाणे**

**नोंदणी क्रमांक - महा / ३११७ /१० / ठाणे**

❖ प्रकाशन दिवस

**८ एप्रिल २०११**

© ईशान घनश्याम पोटभरे

ईमेल : igpotbhare@gmail.com

# ....आणि आम्ही सर्व ब्रह्म झालो !

तीनेक वर्षांपुर्वी इंटरनेट ऑर्कुटवरच्या मराठी कवितांच्या कम्म्युनिटीमध्ये एक दिवस “अहम् ब्रह्मास्मि” या नावाने एक प्रोफ़ाईल आलं. सुरूवातीच्या त्यांच्या कवितांवरून कोणितरी गंभीर व्यक्ती असावी असं वाटे. पण लवकरच ते सर्वांशी खेळीमेळीने आणि मिश्किलीने संवाद साधू लागले. त्यांच्या कवितांचा दर्जा तर खूप वरचा होता. पण त्यांच्या वागण्यात मात्र कुठेही अहंभाव नव्हता. हळू हळू सर्वच लहान थोरांचे ते स्नेही झाले. त्यांच्या कवितांतून एकीकडे अहं ब्रह्म असल्याचा अभिमान होता तर दुसरीकडे सर्वच जण ब्रह्म असल्यामुळे इतरांबद्दलचा लीन भाव होता.

ठरव फ़क्त तू
हालतील पर्वत
जाऊन त्यांना
धडक बेमुर्वत

अशी जीवनाच्या शक्तीची जाण एकीकडे होती आणि जीवा लागले वेड परतुनी शिवामधे हरवावे अशी विरक्तीची ओढ दुसरीकडे. अत्यंत निरामय निरिच्छ पण कर्तव्यबुद्धीने ते त्यांची कार्ये पार पाडत. त्यांची प्रिय पत्नी आजाराने ग्रासली असता त्यांनी सर्व गोष्टी बाजुला सारून तिच्या सेवेत वेळ अर्पण केला. तिच्या मृत्युनंतर वर्षभराच्या काळातच तेही ऐन चाळीशीतच ईहलोकीची यात्रा संपवून ब्रह्मात विलीन झाले. त्यांच्या कवितांत एकही तथाकथित प्रेमकविता नव्हती. पण त्यांचं जीवन हीच एक प्रेमकविता बनली.

स्वतःला अहम् ब्रह्मास्मि म्हणवून घेत असतानाच ते इतरांचा उल्लेखही ब्रह्म म्हणून करीत. स्वतःत आणि इतरांत एकच ब्रह्म वास करते आहे ही जाणिव त्यांनी क्षणभरही नजरेआड होऊ दिली नाही. त्यांच्या कविता, त्यांचे विचार आणि त्यांचे जीवन हे इतके एकात्म होते की त्यांच्या कविता वाचताना त्यांचे सतत दर्शन होत रहाते. अतिशय कमी आयुष्यातही त्यांनी त्यांची स्वतःची अशी छाप सोडली. ती छाप ई साहित्य परिवारावरच नव्हे तर मराठी साहित्यावरही कायम उमटलेली राहील.

**ई-साहित्य परिवार**


ॐ

# ब्रह्म आहेस तू

विश्वाला निर्मीले
तुझ्याच मनाने
कोणती कमी रे
तुझ्यात गुणाने ?

ठरव फ़क्त तू
हलतील पर्वत
जाऊन त्यांना
धडक बेमुर्वत।

तू तर प्रकाश
क्षणात पसर
संकल्पात मात्र
नको रे कसर।

कर की निश्चय
पळ .. पाय नसून.
महाभूतांचेच बळ
तुझ्यात वसून ।

शक्य सारे तुला
शक्ती आहेस तू
नको तू विसरू
ब्रह्म आहेस तू ।



## गंमत

त्याने पेरली..
काही सूर्य-बीजे
अंतरिक्षाच्या शिवारात
अन स्वतःचा गाभा फ़ोडून..
तप्त लाव्हा बरसला दशदिशांना
इतकं करुन मग तो निश्ंचित झाला
आज काळाच्या एका तुकड्यावर फुटलेत..
त्या बीजांना अंकुर छान भरघोस पीक आलंय
लक्ष लक्ष आकाशगंगांची कणसं डोलतायंत
प्रत्येक कणसाला लगडले आहेत हजारो सूर्य, लाखो चंद्र

हा शेतकरी मात्र..
अगदीच अजब आहे
आता निवांत झोपलाय
भरल्या पिकाकडे पाठ करुन
त्याला ना पिकाच्या राखणीत रस
ना पिकाची कापणी, साठवणी करण्यात
जणू सहज गम्मत म्हणून शेती करुन पाहिली
झोपेतून उठल्यावर कोण जाणे कुठली लहर येईल..!!



# परीघावरचा प्रवास

फ़िकीर उद्याची कशा करावी
कालच तो तर येऊन गेला
काल परीघावर मागे जाता
बिंदू उद्याचा कालच झाला

आदि अंत ना काल वर्तुळा
बिंदुवर मी उभा आजच्या
चालत रहाता पुढे पुढे मी
पोहचेन जागी आरंभाच्या

जिथे असे ते घर प्रेमाचे
घेईन म्हणतो तिथे विसावा
शीणच सारा हरुन जाता
पुन्हा प्रवासा आरंभ व्हावा

विसरीन जर का परी कधी मी
प्रवासात घर मुक्कामाचे
आनंद सारा हरपून जाईल
प्रवास होईल केवळ ओझे

परीघावरती फ़िरताना मग
कधी एकदा असे घडावे
घरीच रहावे कायमसाठी
भटक-चक्र हे थांबुन जावे



## जल-बिजे

मेघातुन जल-बिजे उठली
उंच जमिनीला ती भिडली
कच्च-कोवळे शहारे घेऊन
गुपिते ओल्या देही दडली

बिजांना दिसतो जो तारा
थरथरता अन बावरणारा
त्या ताऱ्याला स्पर्शायाला
शर्यत बिजांची हो घडली

एक बिज ते खरे धिटुकले
धाव घेऊनी तुटून पडले
बिजे बाकी जरा लाजरी
लाज तयांची भारी नडली

चपळ बिज ताऱ्यास झोंबले
त्यामाजी अस्तित्व कोंबले
वरमाला त्या बिजा घालून
का रात्री त्या जमीन रडली ?



# श्रावणातल्या उन्हात



श्रावणातल्या उन्हात देहा सोनकेवडे स्नान घडे
रिमझिमत्या थेंबांना पिऊनी मन झाले ते वेडे

लाल पोपटी नव्हाळ पाने डोळ्यामधुनी सळसळती
नदी तांबडी भरुन वाहे नसानसातुन खळखळती

आकाशाचा गंध दरवळे मातीमधुनी रूजताना
शुध्द स्वरांनी आर्जव करीते  प्राण पाखरु भिजताना

कंठातूनी जी तान  उमलली सात स्वरांच्या इंद्राची
सप्तक सारे रिचवून उरली क्षुधा आतल्या मंद्राची

रसना झाली तृप्त पिऊनी  शुध्द मधुर ते अमृत
आपुल्याच प्रतिबिंबावरती चंद्राची जडली प्रीत

मेघ सावळे दाटून येता हृदयी भरल्या आठवणी
किणकिणणा-या  भरल्या हाती लालस मेंदी शुभशकुनी

कायेवरती फुलला काटा हुळहुळणारा मरवासा
भटक्या पायी कसा बिलगला रंग अनोखा हिरवासा

मुक तरीही ओली माया पोटी आली दाटून
मंजुळवाणी साद घालतो चिमणा पक्षी पाठुन

श्रावणमय  ते अवघे झाले अपरा आणिक परा
जलधारांचा पदर ओढते श्रृंगारित ही धरा



# बाकी रस्ते मिटले

हिमालयावर तप आचरावे
नसे कामना ही मजला
परमानंदाच्या हिमवर्षे
शिखरासम आत्मा सजला

गंगेमध्ये पावन व्हावे
इच्छा आता न उरली
ईशकृपेचा प्रपात झेलून
दुधडी प्राण नदी भरली

यज्ञयाग व्रतवैकल्याची
गरज आताशा न भासे
ज्ञानयज्ञ हा अखंड चेतून
इच्छांच्या समिधा ग्रासे

देव-देव करणे ना आता
तिर्थाटनही सुटले हो
एक आतला रस्ता उमले
बाकी रस्ते मिटले हो



# कधी कधी

कधी कधी डोळ्यामध्ये उगाचं पाणी येतं
घशामध्ये काहीतरी टोचल्यावाणी होतं
डोळ्यासमोरचा सूर्य मावळत जातो
आकाश जणू एक उदास कहाणी होतं

घरट्याकडे तेव्हा परतू लागतात पक्षी
विटत जाते उधळलेल्या  रंगांची नक्षी
बिचा-या ढगाचं तोंड दिनवाणी होत
कधी कधी डोळ्यामध्ये उगाचं पाणी येतं

सारं आयुष्य होत एक पोकळ दिखावा
जणू सतारीचा सारा सूरचं कुठे हरपावा
जग दाटून आलेली कातर विराणी होतं
कधी कधी डोळ्यामध्ये उगाच पाणी येत



# तिथे ना असावी

अंतरात तुझीया देवा, जाग मला यावी
छाया हर्ष व खेदाची, तिथे ना असावी

सहाणेवरी दुःखाच्या, आयुष्य झिजले
उगाळले जाण्या थोडे, सुख शिंपडले

तुट्लेल्या चंदनाला, पालवी फुटावी
छाया हर्ष व खेदाची, तिथे ना असावी

लागला गळाला मासा, अमिष दिसता
किसला गेलासे हात, किसता किसता

तहान नी भूक माझी, तुझी भक्ती व्हावी
छाया हर्ष व खेदाची, तिथे ना असावी



# डाव चालुच रहायला हवा

ती नी मी..

बुद्धिबळाचा डाव खेळताना

मी चेक-मेट दिला

हसलॉ खुषीत मिशीतल्या मिशीत

ती म्हणाली

असा संपवू नये डाव राजा

डाव चालुच रहायला हवा

चालु रहायला हवा

आणि शांतपणे मेलेल्या राजाचा मुडदा उचलून

तिने पुन्हा पटावर उभा केला



## मी नसेच तों रे



मी नसे शरीर वा, नसे बुद्धि अन मन हे
मी नसेच तों रे, जसा समजती जन हे

मी मातीचा ना सुर्याचा
ना आकाशाचा कोणी
वारा ना माझा लागत काही
आणिक ना रे पाणी

होतो तेव्हाही....नव्हतेचि जेव्हा घन हे
मी नसेच तो रे, जसा समजती जन हे

मी सत्य-असत्या पल्याड
मजला पाप-पुण्य लागेना
ना धर्म कोंठला माझा आणिक
इच्छा मज बाधेना

सुख-दुःखांविन...सजले माझे जीवन हे
मी नसेच तो रे, जसा समजती जन हे

श्वासांचा झुला झुलवत सा-या
रुधिरामधुनि वाहे
परी ना दिसतों जों कोंठेही तों
तोच खरा मी आहे
जे नभात फुलले...असे आगळे वन हे
मी नसेच तो रे, जसा समजती जन हे



अहं ब्रह्मास्मि

# दिवे कशाला

दिवे कशाला सूर्य उगवता
पाय कशाला पंख उघडता
जाणण्यास मग काय रहाते
एक स्वतःला जाणुन घेता

फुल उमलता कशास अत्तर
सवाल नसता कसले उत्तर
बंदी बनवूनी स्वतःलाच का
बंदीगृही फोडावे फत्तर

अंधारावर का भाळावे
किडे मकोडे का पाळावे
गंगा सारी दारी असता
डबक्या मध्ये का लॊळावे

घर विश्वाचे उघडे असता
चौ भिंतींवर कसली सत्ता
चुल बॊळकी मातीची ती
त्यांच्या बद्दल कसली ममता

अमृत असता मदिरा का ती
निवड असे ती माझ्या हाती
एकाशी त्या नाते जुळता
हवी कशाला बाकी नाती



## मन

मन माकड माकड, त्यात शेपूट वाकडं
पेटवूनही जळेना, असं ऑलेतं लाकुड

मन माजलेला बैल, त्यात दावे त्याचे सैल
मन अथांगशी निद्रा, नाही कुठे त्याचा पैल

मन गुहा वाघळाची, त्यात रात्र अवसेची
नाचतात संबंधाच्या, तालावर भुते पाची

मन सापापरी चाले, त्यात पंखही फुटले
काथ्या झाला वस्त्रगाळ, त्याने इतके कुटले

मन बकासुरी भूक, त्यात दुष्काळाचे मूख
मिळाले ते विसरले, जे ना मिळे त्यात सुख



## दंगा

आभाळाच्या घरट्यामध्ये
ढग पक्षी बनून येतात
थोंडा वेळ दंगा घालून
आपल्या मार्गे उडून जातात

थांबा म्हणुन थांबत नाहीत
हाकलून सुद्धा जात नाहीत
कधी वारा पिऊन येतात
कधी पाऊस घेऊन जातात
थोंडा वेळ दंगा घालून
आपल्या मार्गे उडून जातात

चिमण्या पाहून आभाळ भुलतं
पंखाच्या स्पर्शाने ते खुलतं
चिमण्या त्याचा कब्जा घेतात
येडा खुळा त्याला करतात
थोंडा वेळ दंगा घालून
आपल्या मार्गे उडून जातात

कधी येतात गिधाडे बनून
खेचतात त्याची शेपटी धरुन
आभाळाचे लचके तोंडून
मातीमध्ये त्याला घोंळतात
थोंडा वेळ दंगा घालून
आपल्या मार्गे उडून जातात



# Designer Poem



हा..
माणुस..
एक अपरिचित शब्द..
प्रत्यक्षात पाहिला मात्र नाही कधी.
पाहिल्या आहेत फक्त त्याच्या जुजबी प्रतिकृती..
भविष्यकाळातले काही प्रॉटॉ-टाईप्स.
असंख्य त्रुटींनी भरलेले..
तकलादू.
का?

कारण..
निसर्गतः..
२ माकडाच्या संयोगाने..
वाढत रहाणार फक्त वानरांचीच पैदास.
सहस्त्रावधी वर्षांनी उत्क्रांतीचे सागर ओलांडून..
अवतरेलही कदाचित खराखुरा मानव..
दाखवलीय ज्याने झलक..
क्वचितच..
कधी.



## माझं जग

आभाळाच्या कॅनव्हासवर.. चितारलेले ढग..
खरं सांगु का? इतकचं तर.. आहे माझं जग.

ढग कधी सॉनपंखी.. कधी किर्र कावळे..
कधी शुभ्र कापुसगुंडे.. कधी साजण सावळे.

आभाळ माझे मोजायाला.. ढगांचीच पट्टी..
ढगांच्या असण्याशीच.. पक्की झालीय गट्टी.

ढग येतात-जातात.. कॅनव्हास तसाच असतॊ..
पाखॊटीच्या पैलाव्याला.. उगीच वेगळा दिसतॊ.

भक्क एखाद्या मध्यान्ही.. निवळुन येताच नजर..
अर्कोळलेले नितळ आभाळ.. डॊळ्यात करते गजर.

अनंत पिढ्या मग माझ्या.. सहज स्वर्गात जातात..
आभाळ होऊन माझ्या ऒल्या.. डॊळ्यांमध्ये पहातात.



# अस्तित्व फक्त

चिंता जराही नाही, कसलीच नाही खंत
घडते आनंदयात्रा, असता ईथे जिवंत

अस्तित्व फक्त येथे, आहे पुरे खुषीला
मिळतात मुक्त प्राण, मी एक भाग्यवंत

माझ्यापरी न कोणी, मी आगळा निराळा
माझ्याच ठायी वसते, संपूर्ण ते अनंत

भूते ही शक्तीशाली, दिमतीस येत माझ्या
पृथ्वी ही भोगतो मी, श्वासा नसे उसंत

वर्षा ऋतु सुखाचा, शिशीरातही आनंदी
सौंदर्य हर ऋतुचे, ह्रदयी सदा वसंत

जगता असे भरुन, या चालत्या क्षणात
मृत्यु कधीही यावा, होईल तो सुखान्त



## आम्ही तर



रोज नव-नवीन चमत्कारी खेळणी
विज्ञानाला हाताशी धरुन..
आम्ही आज तयार करतो

आम्ही तर आधुनिक ब्रह्मदेवच..
विश्वाची निर्मीती करणारे

अमाप संपत्ती साठवतो, जपतो
कोणताही भलाबुरा मार्ग अवलंबून..
सतत त्यात वाढ कशी होईल ते बघतो..

आम्ही तर आधुनिक विष्णुच ...
सगळ्यांचा प्रतिपाळ करणारे

काळीज गोठवून टाकणारी भिषणता
आम्ही चहाच्या घोटाबरोबर
मिटक्या मारत पितो

आम्ही तर आधुनिक शंकरच...
सहजतेने हलाहल पचवणारे



## श्वास

सोबती क्षणाचे सारे..
सोडूनिया जाती खास
सोडले कधी न ज्याने..
असा फ़क्त माझा श्वास

जे-जे काही केले गेले
मीच केले, वाटे मला
करविता तोच होता..
वृथा अहंकार केला

तयाचि अवज्ञा फ़ार..
केली आजवरी हाय.. !
सोडुनिया तोहि जाता..
जगी मग उरे काय ?



# देव नाही.. न्हावी नाही

न्हावी थोडा चिडून म्हणाला...
“देव नसे तो कुठे जगात
असता तर का इथली दुःखे,
बसला असता असा पहात?”
“जगात या न्हावीही नाही”
एक गि-हाईक म्हणे हसोनी,
रस्त्यावरच्या जटा वाढल्या..
भणंगाकडे बोट दाऊनी
न्हावी आश्चर्याने वदला...
“काय बोलता हे हो बापू !
माझ्यापाशी आल्याविण तो,
केस तयाचे कसे मी कापू?”
“तसेच तेही आहे मित्रा”
गि-हाईक ते ज्ञानी बोले
“देवापाशी गेलो तर ना
निवारील तो दुःख आपुले!”



# शोध अस्तित्वाचा



घेऊ जाता बुद्धी, शोध अस्तित्वाचा
अहंकार साचा, गळो पडे

जेथून आरंभ, जाहला सृष्टीचा ..
तयाही पूर्वीचा, कोण, काय ?

खुंटला विचार, चक्रावले डोके ..
मनाचेही झोके, बंद झाले

बाहेरील शोध, आपचि थांबला..
क्षणी उतरला, अंतरंगी

सापडली तेथे, सारेचि उत्तरे..
प्रश्न आता नूरे, कोणताही

आपणच होता आपुल्यात बंद
आनंदाचा कंद, एकलाचि

पडता बाहेर, शांती काढे पळ..
सुटले वादळ, दाही दिशा



# पैसा



पैसा झाला ईतका मळका
हातामध्ये धरवत नाही

माणुसकीची अब्रु उघडी
नोटांमध्ये झाकत नाही

नाकारावे परी ते कागद
अशी कुणाची शामत नाही

वेडे झाले वेडे झाले
माझा असला भारत नाही

नरकामधले पैसे सुद्धा
खुशाल कोणी वेचत राही

कुत्र्यापरी नोटेला हुंगुन
माणूस तेथे धावत राही

झडप घालणे हल्ली हल्ली
जनावरांना शोभत नाही

लाज वाटते म्हणून मीहो
माणूस मजला मानत नाही



## संधी

विरता विरता पुन्हा उमटली
आयुष्याची नश्वर रेषा
तेंव्हा कोठे मला उमगली
थंड अटळ मृत्यूची भाषा

श्वास सहजसे चालू असता..
कितीक गमज्या केल्या होत्या
खांद्यावरुनी मिरवत मी च्या
रोज पालख्या नेल्या होत्या

हाका मारत होते अविरत
त्या ह्रदयाला साद न दिली
दुनियादारीच्या बाजारी
हाक तयाची मुकी राहिली

थकले मग ते आणि थांबले
तेंव्हा कोठे जागा झालो
परी उमगले नाही कूठल्या
अंधा-या या जागी आलो?

गुदमरलेल्या मला पाहुनी
ह्रदयाला मम करुणा आली
पुन्हा बिचारे चालू झाले
पुन्हा एकदा संधी दिधली



# जिवा लागले वेड



जिवा लागले वेड परतुनी शिवामधे हरवावे
सुखशय्येला सोडुन त्याच्या मांडीवर झोपावे

शय्या इथली मऊ मखमाली
परी कधीच ना झोप लागली
सतत इथे मी कुशी बदलली
का निद्रेच्या राणीने मम नयनांना शापावे ?
जिवा लागले वेड परतुनी शिवामधे हरवावे।।

थेंब उपजता निर्मळ होता
मलीन झाला भूवर पडता
नदी नाल्यातून वहात जाता
कसे तयाने आपल्या रुपा मातीसवे जपावे ?
जिवा लागले वेड परतुनी शिवामधे हरवावे।।

फ़ार पाहिले फ़ार साहिले
काट्यामधुनी फ़ूल शोधिले
फ़ूल विसरुनी काटे जपले
कुठे जाउनी उरात रुतले काटे हे काढावे ?
जिवा लागले वेड परतुनी शिवामधे हरवावे।।



## गंधात नहाला



हसता कळी जराशी, वारा भरात आला
छेडून पाकळीला, गंधात तो नहाला

देहावरी कळीच्या, फ़ुलला मऊ शहारा
झाले गुपित उघडे, सैलावता पहारा.
वेडाऊनी बिलगला , दंवबिंदू एक ओला
छेडून पाकळीला, गंधात तो नहाला

सरलेच बालपण अन, चाहूल यौवनाची
रंगात विश्व जागे, होळी तनामनाची
भ्रमरास गंध आला, मधुसेवनी बुडाला
छेडून पाकळीला, गंधात तो नहाला

यात्रा एका दिनाची , संपून अंती गेली
होऊन ती रितीशी, मातीमधे मिळाली
मातीस गंध ओला, व्यापे चराचराला.
आत्मा अता कळीचा, गंधात त्या नहाला



# जन्म माझा एक बीज



जन्म माझा एक बीज
फूल त्यात दडलेले
सारी कृपा देवाजीची
नवल हे घडलेले

ध्यास लागे या बीजाला
फूल झालो ना अजून
नाही जावयाचे मला
बीजातच कोमेजून

अंकुर तो इवलासा
मारे धडका आतून
आराम न जरासाही
त्याला फूल झाल्याविन

मिळे पाणी ऊब माती
भरकटे अवधान
परी उरी खोल सल
नाही शांती समाधान

सार्थक जन्माचे व्हावे
इतुकीच आहे आस
मातीतून मुक्त होत
घ्यावे मोकळेसे श्वास



## Truth will remain forever..

अवकाशातील सारी भोवंड,
ते घेतील वेढून ..
मेंदुवरच्या सुरकुत्यांमधे .. एक दिवस.
तरीही त्या वेढ्याच्याबाहेर..
एक अवकाश असेलच ना?

मिट्ट अंधार-गाभ्याचा,
ते काढतील अर्क..
सगळ्या चराचराला फासण्यासाठी.. एक दिवस.
तरीही तो काळोख पाहण्यासाठी..
एक प्रकाश असेलच ना?

त्या सर्वशक्तीमानापासून,
ते होतील विभक्त..
स्वतंत्र अस्तित्व दर्शवण्यासाठी.. एक दिवस.
पण तरीही त्यांच्याभोवती अद्वैताचा..
एक पाश असेलच ना?



## थांब जरासा

किती पयसी पयसी
दम ना रे खिनभर
जगावये लागे काय
उला कांदा नी भाकर

किती बोयसी बोयसी
तोंडाले तू दे ईसावा
खरचले जाय बळ
सबुद अमोल ठेवा

किती पहासी पहासी
नदर ठरंना झाली
बाहिरंले दौडताना
आत ती वळंना झाली

किती ऐकसी ऐकसी
झाला कोलाहल कानी
कशी तुले येईल ऐकु
देवाजीची मुक वाणी

किती हालसी डोलसी
थिर जरा का होईना
जीवाले तु शांतवाया
नेहाळ आपुल्या मना



# दोन कळ्यांची ओंजळ



दोन कळ्यांची ओंजळ माझी
तुझी फुलांची बागच सारी
हात पसरुनी फुल मागता
जा म्हणशी तु पुढच्या दारी

तुझी मालकी त्यावर आहे
मजला आहे पक्के ठावे
काय करु हा जीव गुंतला
फुलांविना मी कसे जगावे

मागत नाही बाकी काही
शपथ फुलांची तुजला देतो
सुनासुना देव्हारा माझा
शयनकक्ष तव रोजच सजतो

विचार ना त्या फुलांनाच तु
इच्छा काय असे ती त्यांची
बागेत तुझिया जरी ती फुलली
असली दौलत देवाघरची



# भिंती

बांधुन भिंती पहाडापरी
मानवतेला चिणले त्यातुन
चढवत गेले विटा, विटांवर
टाहो फुटले जरी तयातुन

त्वेश हातांना, पिसाट भारी
द्वेष विखारी, अचाट-कारी
खून पहाया सरावलेले
थकले ना ते रक्ता पाहून
चढवत गेले विटा, विटांवर
टाहो फुटले जरी तयातुन

समजे ना त्यांना हे घातक
भिंत असे गर्वाचे द्योतक
खिळे नी काचा धारदारशा
भिंतीवरती ठासून रोउन
चढवत गेले विटा, विटांवर
टाहो फुटले जरी तयातुन

भिंती वाढत, गेल्या वेढत
आभाळाचे तुकडे पाडत
मोरापरी हे झुंझट कुक्कुट
खुराड्यांत त्या दाविती नाचुन
चढवत गेले विटा, विटांवर
टाहो फुटले जरी तयातुन



# एक छॉटी

एक छॉटी
पॉटासाठी
ट्रॅफिकच्या पुरात
फोफावलेल्या धुरात
खपाटलेले पॉट दाखवून
चेह-यावर लाचारी थापून
भुकेचे गाणे गात होती
कोरडे हुंदके देत होती

वय तिचे बागडण्याचे
रुसण्याचे अन फुगण्याचे
पण रुसणे गेले होते संपून
बागडणे गेले होते हरपून

लोक हातानीच झिडकारत होते
कुत्र्यासारखे हाड हाड करत होते
तरी तिथेच घुटमळत होती
सारे अपमान गिळत होती

कॉण तिचे कौतुक करणार?
कॉण तिच्यावर सावली धरणार?
तिच्या आयुष्याचे पुढे होणार तरी काय?
रस्ताच जिचा बाप, अन रस्ताच जिची माय !



# शून्य

१

एकाजागी
एक होतं शून्य
पक्कं अहंमन्य
कधी अणू, कधी ब्रह्मांडाएवढं
कधी कारकून कधी गुंडा एवढं
शून्याच्या पोटात, आणखी बरीच शून्यं
जेवढी अधिक शून्य, त्याला वाटे धन्य!
प्रत्येक शून्याच्या मूल्याला, मागचा एकचाच आधार
तो एक असेपर्यंत रोषणाई, आकडा काढताच अंधार !
दाहक सत्याला झुगारून देऊन, मिरवत राही आपलाच तोरा
भरपूर गिचमिड करून देखील, कागद अखेर करकरीत कोरा
शून्याला अंधुकशी जाणीव, काही आपले आहे हरवले
शोधून - शोधून थकून गेले, काय शोधतो तेच विसरले
कधी शोधी कागदावर, कधी शून्याकडेच
अजून कुठे शोधेल, त्याचे जग एवढेच
शून्य निराशेने, आकसत गेले
पोकळीमध्ये,नाहीसे होत गेले
अंतिम क्षणाला
त्याला स्मरला
तो एक
१



# कविता एक स्पंदन असते

कधी कधी रणकंदन असते
कवित अशी - अशी असावी
असे काही बंधन नसते

कधी अंतरातले ह्दगत असते
कधी स्वतःचीच फ़सगत असते
घनदाट जंगल माजलेले कधी
कधी सुबकशी मशागत असते

चांदणं, आकाश, फ़ुले असते
वेश्यावस्तीतली मुले असते
स्वर्ग काय आणि नरक काय
कवितेला सारेच खुले असते

मोजुन मापुन जोडलेली असते
सफ़ाईदारपणे खोडलेली असते
कधी अंगावर येते जशी
धरणाची भिंत फ़ोडलेली असते

ईश्वराला केलेले वंदन असते
देहाने केलेले आक्रंदन असते
कविता अशी अशी असावी
असे कुठलेच बंधन नसते



# सत्य कविता

माझ्या ओठात सिग्रेट
तिच्या डोळ्यात रिग्रेट

हानिकारक वगैरे लेक्चर
ते मग सगळं रीतसर

मी बधेना कश चालुच
दिली तीने चॉकलेटची लालुच

चॉकलेट झाल्यावर नविन शिलगावली
आता मात्र ती पुरतीच कावली

खसकन घेतली हातातुन ओढुन
विझवली स्वतःच्या हातावर चिरडुन

मी सुन्न हदयात काही हललं
खरंखुरं प्रेम मला जाणवलं

तीचा हात पाहुन काळजात गलबलंलं
सिगारेट सोडावी लागणार याचही वाईट वाटलं

पण मन तिच्या कृतीने थरारलं होतं
खोल खोल आत काही भरारलं होतं

मला तिच्या नजरेचा थेट तळच दिसला
काळही मग त्याच क्षणात जागीच थांबला

सारं जग एकिकडे एकिकडे ती होती
फ़क्त माझी होती ती कोणी जी होती

डोळ्यांनीच दिलं वचन मग ती हसली
हात हातात घेउन मी हळुच फ़ुंकर घातली

त्या क्षणांची फ़ुलपाखरे
आठवणीत जपली आहेत
तरी त्या नंतरही अनेक पाकिटे संपली आहेत



# पुन्हा एकदा उडु दे

तुझी हिरवीशी ज्योत
माझ्या वातीस भिडुदे.
अंधारुन आल्या मनी,
मस्त प्रकाश पडुदे.

झाला तलाव कोरडा,
तुझा मेघ बरसुदे.
सुकलेल्या नयनात,
दोन थेंबांना हसुदे.

तुझा सुर रे मिळु दे,
जीवा कुडीत जपाया.
ऐकताना यंत्र-गाणी,
जीवन जाते हे वाया.

काळ्या पांढऱ्या ढगांशी,
तुझा कुंचला खेळूदे.
स्वतःच्याच सांत्वनाला,
मला शब्द रे मिळूदे.

रेती झालेल्या काळाला,
माझ्या मुठीत दडु दे.
राखेतुन पक्षाला या,
पुन्हा एकदा उडु दे ...
पुन्हा एकदा उडु दे.



# विझु विझु

दिवा होई विझु विझु
निजु लागता पहाट
मेले मढे लागे सजु
रुजु कामाला रहाट

सोन्यापरी पाणी आणी
राणी मदिरा फुफाट
देवापुढे नंगी गाणी
नाणी घुमती पिसाट

लागे चकवा चकवा
थकवा देहात दाट
कसा धरावा तकवा
लकवा मारते वाट

बगळ्यांचि जय जय
मयसभी उडे थाट
आकाशाला व्यापे भय
गय नसे येता लाट

सुजन ते गोरे मोरे
घोरे घुमटाचा माठ
विटंबती रांडा पोरे
सुरे झेली रोज पाठ



## मन झाडाचे

मन झाडाचे असे कसे ते
हरकत नाही साज लेऊनि
निळे सजण भेटीला येता
नाचत नाही गीत गाऊनि

मन झाडाचे असे कसे ते
शोक तयाला का न वाटे
वणवा जाळे उन्हात पोळे
दुःखाने परी ते ना फाटे

मन झाडाचे असे कसे ते
आपले परके ते ना जाणी
अनोळखी जरी येता दारी
देऊन टाके मुक्त हातांनी

मन झाडाचे असे कसे ते
कळ्या आपल्या ते ना मिरवी
अकालीच त्या खुडल्या कोणी
आपली शांती ते ना हरवी

मन झाडाचे असे कसे ते
खंत तयाला कसली नाही
छाया त्याचि तुटून गेली
कु-हाड त्याला डसली नाही

मन झाडाचे असे कसे ते
निरीच्छ आणिक उदासवाणे
असो ऋतु हिरवा की पिवळा
अथक गाई ते जीवनगाणे



# देह माझा तेथे

मंदिर गाभारी
थंडावा थंडावा
देह माझा तेथे
हलके सांडावा

देवाचिये पायी
पहावे निजुन
मंदसा अंधार
उशाला घेउन

पांघरावा गंध
पाषाण फुलांचा
अंगात मुरावा
गारवा भुमीचा

शांतता अपार
मनात साठावी
चांदण्याची चव
जिभेवर यावी

डोईवर हात
देवाचा असावा
देहाला मिळावा
शुन्यात विसावा



# सांज भाळली

नभ लाजरे गोजरे
सांज पाहुन भाळली
तिचे पाऊल निघेना
तिथे जरा रेंगाळली

वारा झुळुझुळु वाहे
पाने हासती नाचती
दूर कोठे दरीखोरी
सूर चंदनी वाजती

मेघ अबोली रंगाचे
फुले बरी गज-यांना
नदी चाले डौलदार
कधी माळुन तयांना

पाखरांची झाली आता
घरी निजायाची वॅळ
वारा अंगाई म्हणतो
सारा शांत शांत माळ

नभ-धरेच्या छायेत
आज तरारले रान
क्षितीजाच्या शपथेचे
परी दोघांनाही भान





## अभंग

सोंपविला भार

सोंपविला भार
तुझ्यावर आता
तूच एक त्राता
दयानिधी ।

तुझ्याच छायेत
विसरला शिण
उरले न हिण
देहामाजी ।

धरणी उशाला
आकाशाचि शाल
प्रणवाचा ताल
कानावरी ।

तुटुनिया गेले
पाश संसाराचे
विश्व हे घराचे
रुप झाले ।

हात हे मोंकळे
तुला वंदावया
धन्य झाली काया
तुझ्या पायी ।

आनंदाने जड
विलोप पावले
झाड झेपावले
बिजाकडे ।



## अभंग

नितळ प्राणाने

स्वरूप तयाचे
निर्गुण आगळे
सगुण सोहळे
मांडे तोचि।

चराचर सारे
संकल्प तयाचा
त्याच्याच तत्वाचा
हा पसारा।

जडात तो साऱ्या
मिसळून गेला
तरीही राहिला
अस्पर्श तो।

तोच एक मूळ
अस्तित्व कारण
जन्म नि मरण
खेळ त्याचा

कळणार नाही
देहाने, मनाने
नितळ प्राणाने
जाणवेल।

मन रिक्त होता
तोचि तो उरतो
स्वये प्रकटतो
सहजचि।



## अभंग

चराचरी सा-या

चराचरी सा-या
ब्रह्माचे आकार
जाहले साकार
ठायी ठायी ।

पाखराची चोच
झाडाची डहाळी
दगड, शहाळी
सारे तेच ।

उधळले रंग
वाहणारे वारे
ग्रह आणि तारे
सारे ब्रह्म ।

वस्तुमात्र सारे
अणु रेणु ढग
पेशीचे सुभग
आकार ते ।

ब्रह्मांडात जे जे
तेचि या पिंडात
ब्रह्माचीच बात
तंतोतंत ।

देव ना आकाशी
नको वृथा भ्रम
आहोत ते ब्रह्म
आपणचि ।




अहं ब्रह्मास्मि
जस्मिनचा रवी

# सूर्योदय

नुकताच सूर्योदय झालाय
अन तो जन्माला आलाय
सूर्य-किरणांच्या झोतात चाललाय
धुलिकणांचा एक पिसाट नाच !
त्याच्या मिटल्या डोॅळ्यांनाही जाणवणारा

ते वैश्विक धुलिकण..
उन्मुक्तपणे तरीही एका तालात फ़िरताना
क्षणाक्षणाला वेगवेगळे आकार धारण करतायत
प्रत्येक आकार सत्य आणि सत्यच आहे
पण तोवरच
जोवर दुसरा आकार त्याची जागा घेत नाहीये !
क्षणाक्षणाला बदलणारी सत्यांची मालिका !!

पण त्यांचा आत्मा मागतो आहे..
फ़क्त एकच
आणि अंतिम सत्य

त्याने जाणले
जाणले त्याने
आणि सगळ्या सत्यांची धूळ
एक हळूवार फ़ुंकर मारुन उडवून टाकली

त्याच्या बाळमुठी उघडल्या
आणि बोटे आपोआप ध्यानमुद्रेत गेली

डोॅळ्यात प्रशांत सागर
आणि ह्रदयात आनंदाचे झरे वहाणारा
तो जस्मिनचा रवी..
जन्मजात बुद्ध आहे



# आनंद



रस्ता तुफान वहातो आहे
कर्णकर्कश्श हॉर्न वाजतायत
कुठे किंचाळणा-या गाण्याचे सूर ऐकू येतायत

पण त्याला ते ऐकूच येत नाही
म्हणजे ऐकू येतायत पण नाही सुध्दा
म्हणजे जास्त योग्य पद्धतीने सांग़ायचं तर..
हे किंचाळणारे गाणे आहे की गाडीचा हॉर्न
याबद्दल त्याच्या जाणीवेत कुठलीच नोंद नाहीये !

आणी जे काही चालू आहे
त्यापासून तो एकदम अलग आहे
दूरान्वयानेही संबंध नसलेला

तो अगदी शांत आहे
गाढ शांततेच्या कवचात बंदिस्त
ज्या कवचाला कुठलीही ग़ॊष्ट तडा पाडू शकत नाही
पण तो निर्दीस्त नाही
सर्वसामान्य जाग्या असलेल्या व्यक्तीपेक्षाही जागा
संपूर्ण सजग आहे

त्याच्या कुठलीही हालचाल जेंव्हा होते (अर्थात शरीराची)...
ती आत्यंतिक आवश्यक असेल तेंव्हाच होतेय
म्हणजे बहुदा श्वास घेण्यासाठीच
जवळ जवळ हालचाल रहित आहे तो
आणि मन...
त्याचं तर अस्तित्वच नाहीय कुठे !
बुद्धीची त्याला काडीइतकीही गरज वाटत नाहीये.



आणि आनंदाला पूर आलाय ह्रदयात ..
जिवंत असण्याचा आनंद..
श्वास घेण्याचा आनंद !!!

# खेळणा

त्याच्या पाळण्यावर आता एक खेळणा टांगला गेलाय
गरगरा फ़िरणारा
वैश्विक धुलीकणांपेक्षा जास्त ठोस आकार
ते काय आहे, हे त्याला नाही माहीत पण..
सोंडवाला आकार, शिंगवाला आकार...
निळे, लाल चकाकते रंग!!!

आणी काही चेहरे..
अचानक आकाशात उगवणारे
तृप्त किंवा वेडगळ !
पण एकजात भलेमोठे

तो किलकिल्या डॊळ्यांनी बघतोय.. आणी बघतही नाही
दोन दिवस.. चार दिवस ... सहा .. आठ

तो खेळणा फ़िरायचा थांबल्यावर..
प्रत्येक प्राणी एका विशिष्ट अवस्थेत थांबायचा
पण आज कसं काय माहीत
पण शिंगवाला नी सोंडवाला गुंतले एकमेकात!!

हे काय ?? असं कसं ?????
प्रश्नांची कूठेतरी अस्फ़ुट जाणीव

पहीली प्रतिक्रिया !
मनाचा जन्म झाला
आणी जस्मिनचा रवि आत्मरत अवस्थेमधून दुनियेत भिरकावला गेला
त्या वेळी सूर्य अस्ताला चालला होता!

श्वास घेण्याचा आनंद !!!



# चहल पहल

आज ‘रवि’ चं बारसं
अगदी साग्रसंगीतपणे एका ‘मी’ चं रोपण

भोवताली हास्य विनोद, गप्पा गाणी
थोडक्यात ... गोंधळ चालू आहे

जस्मिनच्या रविला आता..
‘आपल्या’ माणसांचे आवाज समजू लागले आहेत
‘त्यांच’ त्यांचे गंध ओळखू येऊ लागले आहेत
‘त्यांचे’ चेहरे लक्षात राहू लागले आहेत

इतके दिवस तो जोडलेला होता
ज्या विश्वचैतन्याशी
त्यापासून त्याला सफ़ाईने अलग केलं गेलंय

आता सुरु झालाय..
‘मी’ आणी ‘माझ’ चा एक अंतहीन..
भोवळ आणणारा प्रवास

त्याच्याही नकळत..
त्याचं विश्व विभागलं जातंय..
विश्वे विभागली जातायत !!!



# आहार-निद्रा-भय-मैथून



कैवल्याशी जोडलेली नाळ तुटण्यापुर्वीच्या
मधूर आठवणी अजून पूर्ण विसरला नाही तो
पण आता उपद्रव सुरु झालाय.. मनाचा!
ते सतत रविला त्या आठवणीतून बाहेर खेचते

मग रवि रडतो..

आणि आईला वाटते त्याला भूक लागली
किंवा काही दुखत असेल!
तिला कधीच कळत नाही रडण्याचे कारण!!

बघता बघता रवि सरकु लागला, रांगु लागला..
जडाच्या जाणीवा प्रबल झाल्या

वीज चमकावी तसे लख्खकन एखाद्या क्षणी
आपली आनंदमय अवस्था त्याला आठवे!!!
पण निमिषार्धच..

पुढच्याच क्षणी समोर असलेला 'खाऊ'
त्याचे ध्यान खेचून घेई

'झोपेमध्ये' त्याला स्वप्नलहरी स्पर्शू लागल्या

सगळे सुरक्षित, छान-छान असूनही
रवि आता अंधाराला 'भिऊ' लागला होता

आणि अशा भयाच्या क्षणी..
कुणीतरी जवळ हवं असे..
अगदी जवळ..
कुणीतरी..निदान त्याची 'बाहुली'!!!



## संस्कार



प्रेमाचा पाऊस पडला 'रवि'वर
'त्याच्या' लोकांकडून
जवळजवळ सगळे हट्ट पुरे होत होते त्याचे
सगळं जग आपल्याभोवती फ़िरणारं
आपणंच या जगाचा केंद्रबिंदू!!
अशी कल्पना त्याच्या मनात घर करु लागली

आणि त्या कल्पनेला पहिल्यांदा तडा गेला
शाळेत पाऊल ठेवल्यावर
नवीन जग !

ब-याचदा आपल्या मनाविरुद्ध वागणारी 'इतर' मुलं
शिस्त लावणारे शिक्षक नको वाटायची शाळा अगदी !!
एक गुरुजी तर असा फ़टका लगावत.. ओलीच होत असे !
घर सोडूच नये असं वाटे
पण याबाबतीत मात्र घरचे हट्ट पुरवित नसत

एकदा चक्क मधल्या सुट्टीतच पळून आला तो
त्यादिवशी त्याच्या वडिलांनी त्याला धपाटा मारला
पहिल्यांदाच. वडिलांवर रागावला रवि!!
आपल्याला मारणा-यावर रागवायचं असतं
चांगलंच शिकला होता तो!!

हवं/नको, राग/लोभ, दुःख/आनंद
एक एक भावना मनाच्या टोपलीत गोळा होत होत्या
दिवसेंदिवस टोपलीचा आकार वाढतच चालला....

पुर्वीच आलेला एखादा अनुभव, परत आल्यास काय करायचे
याचा अभ्यास अगदी पक्का होत होता
शाळेमध्येही पाटीवर
तीच-ती अक्षरं गिरवणं चालू होतं
'संस्कार' उत्तम प्रकारे घडत होते



जस्मिनचा रवि आता 'विचार' करु लागला होता
आणि सगळ्या घटनांना
'योग्य' प्रतिक्रिया देऊ लागला होता



# रिप्लाय करा रिप्लाय करा



रिप्लाय करा रिप्लाय करा
मोटीव्हेशन  सप्लाय करा

छानु गुड काहीतरी म्हणा
नाहीतर निदान जोड्यानं हाणा

रिप्लाय करा रिप्लाय करा
मोटीव्हेशन  सप्लाय करा

येडे म्हणून का टाकतो इथे कविता
सोलतो मन तुमच्यापुढे न भिता

रिप्लाय करा रिप्लाय करा
मोटीव्हेशन  सप्लाय करा

आवडली नाही एवढं तरी सांगा
नाही घेणार आम्ही तुमच्याशी पंगा

रिप्लाय करा रिप्लाय करा
मोटीव्हेशन  सप्लाय करा



# व ळ व ळ

झु         झु
र       र
ळे
पॉलादी
व ळ  चिमटीमध्ये व ळ
सापडलेल्या
व ळ  झुरळांचे पाय व ळ
करत रहाति
ळ   सतत   व
व                   ळ

दिसलं ना झुरळ ?



# कवी कसला डोंबल्याचा. . !!

संन्यास माझा त्रिदंडी आहे
अर्जुन ना मी शिखंडी आहे
कवी कसला डोंबल्याचा. . !!
मी तर एक गवंडी आहे ।। धृ ।।

सारंच कसं तोलुन मापुन
असं सुबक की यावं छापुन

स्वांत-सुखाय म्हणवणारा. .
केवळ एक . . पाखंडी आहे
कवी कसला डोंबल्याचा. . ।। १।।

फ़ुटपट्टीने शब्द मोजतो
विचारपुर्वक सारं योजतो

माझाच नगारा, माझाच दांडू
माझीच पिटतो. . दवंडी आहे
कवी कसला डोंबल्याचा. . ।। २ ।।

कवितेपेक्षा राजकारण फ़ार
त्याचाच मला खरा आधार

फ़डकत रहावा माझाच झेंडा
जात माझी. . घमंडी आहे
कवी कसला डोंबल्याचा. . ।। ३ ।।



# शराबी

"लोग कहते है मै शराबी हुँ"
अंधारातली चमचम पहात होतो
आयला, बच्चन आपल्याच लायनीतला!
म्हणत मनातल्या मनात होतो

पिक्चर संपताच चमचम विझली
थेटरातला काळोख सोबतीला उरला
पाय आपोआप गुत्त्याकडे वळले
हावरेपणाने माझा प्याला मी भरला

झोकांड्या खातच घरी येऊन पोचलो
वाट पाहून बायकोचे डोळे थकलेले
फाटक्या चादरीत तीन कच्ची बच्ची
गालांवरती अश्रुंचे ओघळ सुकलेले

पोटातली आग डोळ्यात उमटत होती
काही चमचमीत खावेसे वाटत होते
आज घरात खायला काहीच नाही हो!
म्हणताना तिचे काळीज फाटत होते

डोक्यात निराशेचा मोठा स्फोट झाला
संतापाने तिला गुरासारखं मारु लागलो
दचकुन उठलेल्या मुलांनी भोकाड पसरताच
शिव्यांची लाखोली वहात फटकारु लागलो

शिव्या, आरडाओरड यांचा गदारोळ उठत होता
संसार बिनकल्हईच्या भांड्याप्रमाणे कळकत होता
बाहेर लावलेल्या पोस्टरवर 'शराबी' बच्चन
मद्याच्या प्याल्यासकट दिमाखात झळकत होता



# एक कवी



।। अहिंसा परमोधर्मः ।।
कृपया कविता वाचण्यापुर्वी वरील वाक्य मनात घोळवा
(मी चिलखतही घातलेले आहेच म्हणा)

एक कवी फ़िरत असे
शब्द कोंबुन पोत्यात
सापडला जरी तावडीत कोणी
येत असे गोत्यात

शब्दांचे अनेक प्रकार
त्याने पाळले होते
काही होते गरिबावाणी
काही पिसाळले होते

चकली परी कविता तो
झटक्यासरशी पाडी
अडला जर का कधी मधी
उपटे बोकड दाढी

कवितेला त्याच्या कधी
शेंडा बुड नसे
अर्थ कोणी विचारला तर
कवी गुढ हसे

मिश्किलपणे हसुन तो
मनात म्हणत राही
अर्थासाठी उत्सुक आहे
तुमच्याइतकाच मीही



# उगाच सुखिया जिवडा व्हावा

डोळ्यांच्या या खाचा झाल्या
तरी राम तो सदा दिसावा
बहिरे झाले कान तरीही
मंजुळ पावा ऐकु यावा

मीठ भाकरी पूढ्यात येता
पक्वान्नाचा घासच व्हावा
असो कशीही बाह्य परिस्थिती
अंतरात परी आनंद रहावा

बेड्या पडल्या टाळॆ पडले
तरिही त रावा नभी उडावा
फ़िरुनी येता जन्माला मी
पहिल्या गावा मोक्ष मिळावा

दगडावरुनी हातही फिरता
मऊशार तो मज लागावा
बाहेर असो कुठलाही गंध
श्वास सुगंधी होऊन जावा

वादळ वारे सुटल्यावरही
मंदिरातला दिवा जळावा
सुखात असण्या नकोच कारण
उगाच सुखिया जिवडा व्हावा



# स्वर्गीय घनश्याम अच्युत पोटभरे उर्फ अहं ब्रह्मास्मि





एक मोती तयार व्हायला
किती वादळे लाग़तात ?
ठिणगीतल्या प्राणावर
किती वणवे जगतात ?

अहं ब्रह्मास्मि









प्रकाशक आणि वितरक

ई साहित्य प्रतिष्ठान

नवीन मराठी साहित्यिकांना व्यक्त होण्यासाठी एक नवीन व्यासपीठ उपलब्ध करून देण्याचा आमचा प्रयत्न आहे. आपण या नवीन ई साहित्य यज्ञात सामिल व्हावं असा आमचा आग्रह असतो. ई बुक्स हे साहित्याचं भविष्य आहे. इंग्रजीत पाच लाखाहून अधिक ई बुक्स आहेत. तर मराठीत शंभराच्या आत बाहेर. हे चित्र बदलायचंय. यासाठी आपण आमच्याशी संपर्क साधावा. कळावे लोभ असावा.

आपला निमंत्रक

**ई-साहित्य प्रतिष्ठान - esahity@gmail.com – ९८६९६७४८२०**

---

ई-साहित्य प्रतिष्ठानची इतर विनामूल्य ई-नियतकालिके
ई-स्टाप, स्वरनेटाक्षरी ऑडियो अल्बम, बालनेटाक्षरी

## : प्रसिद्ध झालेली ई-बुक्स :

- टल्लीची शाळा
- मकरंदच्या त्रिवेण्या
- ग्रेव्हयार्ड लिटरेचर
- चार क्षण
- तो आणि ती
- प्रियेचे अभंग
- देशी दारुचे दुकान-3D
- ई-शाळा
- तो, मी आणि सिगरेट
- लोकल गॉष्टी
- मोरया
- मीरा (मराठी अनुवाद)
- ऑथंब
- सावळ्या मुलीची गाणी
- सईची वही (काही पान निखळलेली)

**www.esahity.com**